# एक भारतीय तीर्थयात्री सुभाषचंद्र बोस यांची आत्मकहाणी

**सुभाषचंद्र बोस**

अनुवाद

**मीनाक्षी सरदेसाई**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**एक भारतीय तीर्थयात्री :** सुभाषचंद्र बोस
अनुवाद : मीनाक्षी सरदेसाई

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
मीनाक्षी सरदेसाई
'अनुबंध', कृष्णा हॉस्पिटलजवळ,
पत्रकारनगर, सांगली ४१६४१६
मो. नं. : ९५६१५८२३७२

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २००/-

# एक भारतीय तीर्थयात्री
# सुभाषचंद्र बोस
# यांची आत्मकहाणी

# *अनुक्रमणिका*

१. माझा जन्म........................................ ७
२. कुटुंबाचा इतिहास................................. १२
३. माझ्या आधीचा काळ............................. १९
४. शाळेचे दिवस- १................................... २७
५. शाळेचे दिवस- २................................... ३६
६. प्रेसिडेन्सी कॉलेजचे दिवस- १...................... ६३
७. प्रेसिडेन्सी कॉलेजचे दिवस- २...................... ८८
८. पुन्हा शिक्षण सुरू.................................. ९८
९. केंब्रिजचे दिवस..................................... ११७
१०. माझा दार्शनिक आधार............................ १४६
११. तळटीपा........................................... १५७

✦✦✦

## माझा जन्म

माझे वडील जानकीनाथ बोस मागच्या शतकात म्हणजे १८८० च्या सुमारास ओरिसामध्ये आले. उत्तम वकील म्हणून 'कटक'मध्ये त्यांनी आपला जम बसवला. तिथे शनिवार, ता. २३ जानेवारी १८९७ ला माझा जन्म झाला. माझे बाबा हे माहीनगरच्या बोस घराण्याचे वंशज. माझी आई प्रभावती (प्रभाबती) ही हाटसोलांच्या दत्त कुटुंबातून आलेली. मी आपल्या वडिलांचा सहावा मुलगा आणि एकूण भावंडांत माझा नववा नंबर.

हल्ली प्रवासाची वेगवान साधनं उपलब्ध आहेत. त्यामुळे एका रात्रीतच कलकत्त्याहून 'कटक'ला पोहोचता येतं. तेही कोणत्याही त्रासा-संकटाशिवाय; परंतु साठ वर्षांपूर्वी अशी स्थिती नव्हती. लोक बैलगाडीने किंवा घोडागाडीने प्रवास करीत. वाटेत चोर-दरोडेखोरांची भीती असायची. समुद्रमार्गे प्रवास हा दुसरा पर्याय होता; पण त्या प्रवासात सागरी हवामान, वारे, वादळं-तुफानं यांना तोंड देण्याची तयारी ठेवावी लागायची. त्या काळात लोकांचा स्वत:पेक्षासुद्धा 'ऊपरवाल्यावर' म्हणजे परमेश्वरावर जास्त विश्वास असायचा. पाण्यातून चालणाऱ्या नावा, जहाजं हीच लोकांची आवडती प्रवासाची साधनं असायची. लोक जहाजातून समुद्रमार्गे प्रवास करून कलकत्त्याहून 'चांदबली'ला जायचे. तिथून वेगवेगळ्या नद्या-नाल्यांतून बोटीने लोक कटकला पोहोचायचे.

बालपणापासूनच मी माझ्या आईकडून या प्रवासातल्या गैरसोई, त्रास याबद्दलचे इतके किस्से ऐकले होते की, त्या प्रवासाचा अनुभव घ्यावा, असं मला कधी वाटलं नाही. दोन गावांतली अंतरं जास्त नि प्रवासही असुरक्षित अशा त्या काळात माझ्या वडिलांनी वडिलार्जित गाव सोडून केवळ चरितार्थासाठी इतक्या दूर येणं हे नक्कीच मोठ्या धाडसाचं होतं. नशीब हे नेहमीच साहसी माणसांनाच

साथ देतं; मग ते रणांगणावर असो, नाहीतर जीवनात असो! हे मान्य करायलाच हवं. त्या काळात माझ्या वडिलांनी इतक्या लांबच्या आणि अनोळखी शहरात आपलं बस्तान बसवणं हे मोठ्या धारिष्ट्याचंच म्हणावं लागेल. वकिलीच्या व्यवसायातही ते अगदी टॉपवरच होते.

लोकसंख्या किंवा आकार या हिशेबाने 'कटक' हे लहान खरं; पण त्याच्या काही वैशिष्ट्यांमुळे ते एक महत्त्वाचं शहर मानलं जात होतं. कलिंगच्या प्राचीन हिंदू राजांच्या काळापासून चालत आलेल्या परंपरा आणि संस्कृती इथे तशाच टिकलेल्या होत्या. एक प्रकारे कटक ही ओरिसाची अनौपचारिक राजधानीच होती. ओरिसामध्ये जगन्नाथपुरी हे महत्त्वाचं तीर्थक्षेत्र होतंच, शिवाय कोणार्क, भुवनेश्वर, उदयगिरी यासारखी स्थापत्याची कलाकेंद्रंही इथे होती. कटकमध्ये इंग्रज अधिकाऱ्यांचं सरकारी मुख्य कार्यालय होतं. इतरही सरकारी अधिकाऱ्यांची कार्यालयं तिथे होती. एकूण काय, तर वाढत्या वयाच्या तरुणाला आवश्यक असणारा आणि आकर्षून घेणारा असा रुबाब कटकमध्ये होता. एकंदरीत हे असं ठिकाण होतं की, शहरी जीवनाची मजा, आनंद इथे उपभोगायला मिळावा आणि दूरवरच्या किनाऱ्यावर असणारी शांतता आणि निसर्ग याचा लाभही इथे मिळावा.

आमचं कुटुंब श्रीमंत नव्हतं; पण खातंपितं मध्यमवर्गीय असं होतं. म्हणूनच मला कोणत्याही प्रकारची कमतरता कधीही भासली नाही. लहानपणी ज्या मुलांना दारिद्र्य आणि ओढग्रस्तीशी झगडावं लागतं, अशा मुलांच्या स्वभावात स्वार्थ, लोभ, संकुचितपणा असे दुर्गुण शिरण्याचा धोका असतो; पण मी मात्र या अवगुणांपासून दूर राहिलो याचं हेही एक कारण असेल की, गरिबी कशी असते, याचा अनुभव मला कधीच आला नाही. अर्थात, स्वत:ला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजणारं, अहंकार निर्माण करणारं, सत्शील माणसाचं अध:पतन करणारं असं वैभव किंवा थाटामाटाची श्रीमंती आमच्याकडे नव्हती. उलट, माझ्या आई-वडिलांनी आपल्याकडे असलेल्या मर्यादित साधनांचा योग्य तो उपयोग करून आपल्या मुलांचं संगोपन साधेपणाने केलं. त्यांच्या अशा तऱ्हेच्या वागण्याचा मला अभिमानच वाटतो.

माझी स्वत:बद्दलची सर्वात जुनी आठवण म्हणजे - मला वाटायचं की, आपण पूर्णपणे निरुपयोगी किंवा बिनमहत्त्वाचे आहोत. काही मर्यादेपर्यंत माझ्या आई-वडिलांचं माझ्याशी असलेलं वागणं हेही त्याला कारणीभूत होतं. माझे वडील जास्त करून आपल्याआपल्यातच मग्न राहणारे आणि आपल्या मुलांशी सन्मानाने पण थोडंसं अंतर ठेवून वागणारे होते. (काही वेळा त्यांचा हा 'रिझर्व्हनेस' त्यांनी जाणूनबुजून ओढवून घेतलेला आहे असं वाटायचं.) त्यांच्या व्यवसायामुळे आणि थोड्याशा सामाजिक कार्यामुळे आपल्या कुटुंबाला ते जास्त वेळ देऊ शकत नव्हते. त्यातूनच थोडासा वेळ ते काढायचे; पण मुलांची संख्या खूप असल्यामुळे 'उंटाच्या तोंडात जिरं' या म्हणीप्रमाणे त्यांचा तो वेळ सर्व मुलांमध्ये वाटला जाई. आमच्यामधलं जे सर्वात छोटं त्याला अर्थातच आई-बाबांचं जास्त प्रेम मिळे; पण त्याहून छोट्या पाहुण्याचं आगमन झालं की, पहिल्याबद्दलचं प्रेम आटायचं. आम्हा मोठ्या मुलांना कळायचंच नाही की, आपल्या पालकांचं जास्त प्रेम कोणावर आहे. मनात कितीही जिव्हाळा असला तरी वडील तो कोणाबद्दलही विशेष असा दाखवायचे नाहीत. आपण पूर्णपणे नि:पक्षपाती आहोत, असं भासविण्याचा त्यांचा प्रयत्न असायचा.

आणि माझी आई! वडिलांसारखं ती तिचं वात्सल्य लपवून ठेवायची नाही, तर उघडपणे दाखवायची. बऱ्याच वेळा तिचं ते समर्पण आमच्या सहज लक्षात यायचं. इतक्या मुलांना सांभाळता सांभाळता ती किती थकून आणि त्रासून जात असेल खरं म्हणजे! घरात तिचंच राज्य होतं हे निश्चितच. कौटुंबिक बाबतीत तिचे निर्णयच अंतिम असायचे. ती एक जबरदस्त इच्छाशक्ती असलेली स्त्री होती. त्याबरोबरच परिस्थिती नीटपणे समजून घेण्याचं सामर्थ्य तिच्याकडे होतं. तिची आकलनशक्ती उत्तम प्रकारे विकसित झालेली होती. तिच्या या सर्व गुणांमुळेच घरच्या राज्याची ती सम्राज्ञी होती. घरच्या आघाडीवरही तिची कशी हुकूमत चालत असेल, हे सहज समजण्यासारखं आहे.

बालपणापासूनच माझ्या आई-वडिलांबद्दल माझ्या मनात खूप आदर होता नि त्यामुळेच मी त्यांच्या अधिक जवळ जाण्याची आकांक्षा धरली; पण त्यांच्या काहीशा आतल्या गाठीच्या स्वभावाची भीतीही माझ्या मनात असायची. त्यामुळेच की काय, आपल्या माय-पित्यांच्या बरोबर मैत्री असणाऱ्या नशीबवान

मुलांचा मला हेवा वाटायचा. त्या मुलांसारखं आई-वडिलांशी सख्य मला हवं होतं. कदाचित माझ्या भावुक आणि संवेदनशील स्वभावामुळेच ही आस मला लागलेली असेल.

माझ्या स्वत:ला कमी समजण्याच्या - म्हणजे न्यूनगंडाच्या मागे आई-वडिलांशी असलेला दुरावा हे एकच कारण होतं असं मात्र नाही. मला बरीच मोठी भावंडं होती म्हणूनही तो कमीपणा माझ्या मनात असावा; परंतु जे जे झालं ते माझ्या भल्यासाठीच झालं हे मात्र निश्चित. जीवनाच्या सुरुवातीलाच असलेल्या स्वत:च्या अपुरेपणाच्या जाणिवेमुळे की काय, मला वाटायचं की, आपल्याला 'त्या' उंचीवर पोहोचायला हवं की, जिथे आपली मोठी माणसं पोहोचली आहेत. आता ही जाणीव असणं हे चांगलं की वाईट, कोणाला ठाऊक; पण या जाणिवेमुळेच मी फाजील आत्मविश्वास किंवा अति 'बिनधास्त' राहणं अशा वृत्तीपासून दूर राहिलो.

मी कोणी जन्मत: प्रतिभावंत नव्हतो; पण त्या आकलनामुळेच कठोर परिश्रम करून आपल्या कमतरतेची भरपाई केली पाहिजे हे मी शिकलो. माझ्या अंतर्मनात कुठे ना कुठे असा विश्वास होता की, एखादा सामान्य कुवतीचा माणूससुद्धा परिश्रमाने आणि सदाचाराने यशाची शिडी चढू शकतो.

मोठ्या कुटुंबातल्या मुलांचा काही बाबतीत तोटा होतो तो हा की, मुलांकडे तितकंसं लक्ष दिलं जात नाही, ज्याची बालपणी अतिशय गरज असते. बऱ्याच वेळा मुलांच्या व्यक्तित्त्वाचा विकास होण्याऐवजी कुटुंबातल्या माणसांच्या गर्दीत ती मुलं गुदमरल्यासारखी होतात. याउलट मोठ्या कुटुंबाचे काही फायदेही असतात. ते असे की, कुटुंबात राहिल्यामुळे त्यांची सामाजिक जाणीव विकसित होते. आत्मकेंद्रित होणं किंवा मोठ्यांशी उद्धटपणे वागणं अशा दुर्गुणावर नियंत्रण राहतं. जन्माबरोबरच मी एका मोठ्या कुटुंबाचा घटक झालो होतो. आमच्या या कुटुंबात बऱ्याच सख्ख्या भावंडांबरोबरच काका, चुलत भावंडं यांचाही मोठा भरणा होता. साहजिकच मला 'परिवार' म्हणजे विशालच असतो, असं वाटायचं. ही विशालता एवढ्यापुरतीच मर्यादित नव्हती; उलट आमच्या वाडवडिलांच्या गावातून आलेल्या लांबच्या नातेवाइकांनाही आमच्या घराचा दरवाजा नेहमी उघडा असायचा. 'अतिथी देवो भव' या चिरकालीन भारतीय परंपरेप्रमाणे कटकला